CMYK

**शिक्षण ही कधी न संपणारी साधना : माजी आ. तोतारामजी कायंदे** >> पान 2

**राष्ट्रीय स्तरावर शालेय शिक्षणात महाराष्ट्राचे महत्त्वपूर्ण स्थान – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** >> पान 3

**शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली : आ. संजय गायकवाड** >> पान 4



दैनिक

# आपला विदर्भ




**वाढदिवसानिमित्त प्रसिद्ध अभिनेता सुनील ग्रोव्हर साईचरणी नतमस्तक....**


आतील पान


**सुविचार**

विचार सकारात्मक असतील तर परिणामही सकारात्मकच असतो.


apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 20 ■ मंगळवार, दि. 04 ऑगस्ट 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


# भाजपाला मोठा धक्का, राष्ट्रीय अध्यक्षांच्या मतदारसंघात प्रशांत किशोर यांचा दणदणीत विजय

**पाटणा । वृत्तसंस्था :** भाजपाला मोठा झटका लागला आहे. जनसुराज्य पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर यांनी भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या मतदारसंघात खिंडार पाडलं आहे. प्रशांत किशोर यांनी बिहारमधील बांकीपूर विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत एकतर्फी आणि दणदणीत विजय मिळवला आहे. प्रशांत किशोर यांनी भाजपाच्या नीरज कुमार सिन्हा यांचा मोठ्या फरकाने धुव्वा उडवला आहे. बांकीपूरसह गुजरातमधील मांजलपूर आणि मध्य प्रदेशमधील दतिया या विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीचा निकालही समोर आला आहे. दतियात काँग्रेसचा विजय झालाय. तर मांजलपूरमध्ये भाजपाने यश मिळवलं आहे. या पोटनिवडणुकीत विजयी





उमेदवारांनी किती मताधिक्याने विजय मिळवलाय? हे जाणून घेण्याआधी आपण प्रशांत किशोर यांनी काय म्हटलंय? हे जाणून घेऊयात.

हा बांकीपूरच्या जनतेचा विजय आहे. ही निवडणूक आमदार निवडण्यासाठी नाही. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाला, एका चांगल्या व्यक्तीला मुख्यमंत्री म्हणून नियुक्त करण्याचा संदेश देण्यासाठी ही निवडणूक आहे. जनतेने तुमच्या २०२ आमदारांना निवडून दिलं आहे. एखाद्या गुन्हेगाराला किंवा वाईट चारित्र्याच्या व्यक्तीला बिहारचं नेतृत्व करू देऊ नका. एका चांगल्या व्यक्तीला निवडा, जेणेकरून बिहारमध्ये शिक्षण आणि रोजगार उपलब्ध होईल. बिहारच्या मुलांना रोजगारासाठी बाहेर जाऊ लागू नये. हा संदेश बांकीपूरच्या जनतेने दिला आहे, अशी प्रतिक्रिया प्रशांत किशोर यांनी विजयी झाल्यानंतर दिली आहे.

ज्यांनी मला मतदान केले, त्यांचे मी आभार मानतो. ज्यांनी मतदान केलं नाही, त्यांना मी सांगेन की तुमचा विश्वास जिंकण्यासाठी मी अधिक मेहनत आणि प्रयत्न करेन. बिहारला चांगले नेतृत्व मिळालं पाहिजे. बिहारमध्ये सुधारणा झाली पाहिजे, असंही प्रशांत किशोर यांनी नमूद केलं.



प्रशांत किशोर यांनी जवळपास १९ हजार मतांच्या फरकांनी भाजपच्या उमेदवाराचा धुव्वा उडवलाय. प्रशांत किशोर यांनी १८ हजार ९५३ मताधिक्यांनी विजय मिळवला. प्रशांत किशोर यांना ६३ हजार २०३ मतं मिळाली. तर भाजपच्या नीरज कुमार सिन्हा यांना ४४ हजार २५० मतं मिळाली.

दतियात काँग्रेसचा विजय : दतियात काँग्रेसने बाजी मारलीय. काँग्रेसचे उमेदवार घनश्याम सिंह यांनी भाजपच्या आशुतोश तिवारी यांना पराभवाची धुळ चारली आहे. घनश्याम सिंह यांनी आशुतोश तिवारी यांच्यावर ६ हजार १६ मतांनी विजय मिळवला आहे.

मांजलपूरमध्ये कमळ : गुजरातमधील मांजलपूर विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत भाजपने आपला गड राखला आहे. भाजपच्या सतेंद्रभाई पटेल यांनी काँग्रेसच्या भिखाभाई रबारी यांचा ३० हजार ६३० मतांनी पराभव केला आहे.

## ४ ऑगस्टला शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमाफीचे ७ हजार कोटी जमा होणार



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्य सरकारच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत पात्र ठरलेल्या सुमारे १६ लाख ९४ हजार शेतकऱ्यांच्या पीक कर्ज खात्यात मंगळवारी, ४ ऑगस्ट रोजी एकाच वेळी सात हजार कोटी रुपये जमा केले जाणार आहेत. सहकार विभागाच्या या निर्णयामुळे थकीत कर्जदारांना मोठा दिलासा मिळणार असून त्यांचा पुन्हा नवीन पीक कर्ज घेण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

राज्य सरकारने ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांच्या मर्यादेत कर्जमाफी जाहीर केली आहे. या योजनेनुसार पहिल्या टप्प्यात दोन लाखांच्या आतील कर्जदार शेतकऱ्यांची यादी प्राप्तिकर विभागाकडे छाननीसाठी पाठवण्यात आली होती. यामध्ये प्राप्तिकर भरणारे ९४ हजार शेतकरी आढळून आल्याने त्यांना कर्जमाफीसाठी अपात्र ठरवण्यात आले आहे. तर उर्वरित १६ लाख ९४ हजार पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर करण्यात आली असून, या शेतकऱ्यांच्या कर्ज खात्याचे आधार प्रमाणीकरण पूर्ण होताच रक्कम वर्ग करण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत नियमित पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन निधी देण्यात येत आहे. तसेच दोन लाखांपेक्षा अधिक कर्ज थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील उर्वरित रक्कम बँकेत भरल्यानंतर, 'एकवेळ समझोता' (वन टाईम सेटलमेंट) योजनेअंतर्गत त्यांच्या खात्यातही सरकार २ लाख रुपये जमा करणार आहे. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी पात्र शेतकऱ्यांनी काळजी करू नये असे सांगत, या प्रक्रियेमुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्याचे स्पष्ट केले आहे.





## एअर इंडिया इमारतीच्या नूतनीकरणात लोकाभिमुख प्रशासकीय रचनेला प्राधान्य द्यावे : मुख्यमंत्री फडणवीस

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या विविध शासकीय विभागांच्या गतिमान आणि सुलभ कार्यपद्धतीच्या दृष्टीने एअर इंडिया इमारतीचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. नूतनीकरण करताना लोकाभिमुख प्रशासकीय रचनेला प्राधान्य देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे दिले.

वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एअर इंडिया इमारतीसंदर्भातील सादरीकरण करण्यात आले, त्यावेळी त्यांनी संबंधितांना निर्देशित केले. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह अन्य संबंधित वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.





मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, मुख्य सचिव यांनी याबाबत संबंधितांची एक बैठक घेऊन सविस्तर चर्चा करुन सुयोग्य नियोजन करावे. विविध शासकीय विभागांतील कोणत्या विभागांचे स्थलांतर एअर इंडियाच्या नूतनीकरण इमारतीत करणे हे प्रशासकीय आणि नागरिकांच्या दृष्टीने सोयीचे ठरेल हे पाहावे. या ठिकाणी प्रशासकीय कार्यपद्धती ही सुलभ आणि लोकाभिमुख होईल यास प्राधान्य द्यावे. त्यानंतर याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओ पी गुप्ता, विकास चंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव (विशेष चौकशी अधिकारी) पंकज कुमार, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता प्रज्ञा वाळके; तसेच अन्य संबंधित वरिष्ठ अधिकारी, वास्तुविशारद उपस्थित होते. संभाव्य नूतनीकरण आराखड्यांचे सादरीकरण संबंधित वास्तुविशारदांद्वारे करण्यात आले.

## पीएच.डी. अधिछात्रवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज करा – व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे

**मुंबई । प्रतिनिधी :** अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई मार्फत अनुसूचित जातीतील मातंग व त्यातील तत्सम जातीच्या पात्र विद्यार्थ्यांनी २०२३, २०२४ व २०२५ या कालावधीत पीएच.डी करीता अधिछात्रवृत्ती (फेलोशिप) देण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे यांनी केले आहे.

आर्टी मार्फत अनुसूचित जातीतील मातंग, मांग, मिनीमादीग, दखनी- मांग, मांग- म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी, मादगी, मादिगा या जातीतील संशोधक विद्यार्थ्यांकरिता 'अण्णा भाऊ साठे राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती' (एएसएनआरएफ) योजना राबविली जात आहे. कनिष्ठ संशोधन अधिछात्रवृत्ती करिता ३७ हजार तर वरिष्ठ संशोधन अधिछात्रवृत्तीसाठी ४२ हजार रुपये प्रतिमाह अधिछात्रवृत्ती दिली जाणार आहे. त्यानुसार आर्टी, मुंबई संस्थेमार्फत दिनांक १ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत पीएच. डी करिता कायम नोंदणी असणाऱ्या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांकडून पीएच. डी अधिछात्रवृत्तीसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे. त्यासाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी ४ ऑगस्ट २०२६ ते ३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत अर्ज करावे.

या योजनेचा सविस्तर तपशील, कालावधी, निवड पात्रता निकष, मार्गदर्शक सूचना आणि वेळापत्रक इत्यादी बाबतच्या माहितीकरिता आर्टी संस्थेच्या https://www.arti.org.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच संशोधक विद्यार्थ्यांनी https://fellowship.trti-maha.in या लिंकवरून ऑनलाईन अर्ज करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## इथेनॉल मिश्रित पेट्रोल विरोधात युवक काँग्रेस आक्रमक; गडकरींच्या घरावर युवक काँग्रेसचा जनआक्रोश मोर्चा



**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर । प्रतिनिधी :** इथेनॉल मिश्रितपेट्रोल, शिक्षण क्षेत्रातील समस्या, विद्यार्थ्यांचे प्रश्न, वाढती बेरोजगारी आणि जनतेच्या विविध मागण्यांकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी नागपूर शहर युवक काँग्रेसच्या आज वतीने सोमवारी जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आलं. मोर्चा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपूर येथील निवासस्थानाकडे जात असताना पोलिसांनी बॅरिकेड्स लावून आंदोलकांना अडवलं. यावेळी पुढे जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी रोखल्याने काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं.

पोलिसांनी आंदोलकांना बॅरिकेड्सपाशीच थांबवल्यामुळे कार्यकर्त्यांनी तीव्र घोषणाबाजी करत निषेध नोंदवला. त्यामुळे काहीवेळ आंदोलनस्थळी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. मात्र, पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे परिस्थिती नियंत्रणात आली. या आंदोलनातून इथेनॉल मिश्रित पेट्रोलच्या धोरणासह शिक्षण, विद्यार्थी आणि बेरोजगारीच्या प्रश्नांवर केंद्र सरकारने तातडीने भूमिका घ्यावी, अशी मागणी युवक काँग्रेसने केली. जनआक्रोश मोर्चादरम्यान युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. प्रश्न आमचे, उत्तर तुमचे, आश्वासन नाही, हिशेब द्या तसंच धर्मेंद्र तो झांकी है, गडकरी अभी बाकी है अशा घोषणा देत आंदोलकांनी निषेध व्यक्त केला.

आंदोलकांनी आक्रमकपणे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानाकडे कूच करण्याचा प्रयत्न केल्यानं काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं. आंदोलकांना रोखण्यासाठी पोलिसांनी बॅरिकेड्स उभारले होते. यावेळी आंदोलक आणि पोलिसांमध्ये धक्काबुक्की झाली.

शेकडो आंदोलक ताब्यात : जनआक्रोश मोर्चाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थान परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. परिस्थिती चिघळण्याची चिन्हे दिसताच पोलिसांनी तत्काळ कारवाई करत शेकडो आंदोलकांना ताब्यात घेतलं.

# शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या प्रलंबित गोदाम भाडेप्रश्नी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा पाठपुरावा

## अस्तित्व संघटनेच्या मागणीची दखल; प्रलंबित भाडे अदा व स्टोरेज दरवाढीची मागणी

**दैनिक आपला विदर्भ**

**मलकापूर । प्रतिनिधी :** शेतकरी उत्पादक कंपन्यांना महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ आणि अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले गोदाम भाडे तातडीने अदा करण्यात यावे, तसेच स्टोरेज दरांचे पुनर्निर्धारण करून त्यात वाढ करण्यात यावी, या मागणीची केंद्रीय आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) तथा केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दखल घेत संबंधित स्तरावर पाठपुरावा सुरू केला आहे.

अस्तित्व संघटनेच्या संस्थापक अध्यक्षा प्रेमलता सोनोने यांनी यासंदर्भात केंद्रीय राज्यमंत्री जाधव यांना निवेदन सादर करून शेतकरी उत्पादक कंपन्यांसमोरील आर्थिक अडचणी मांडल्या होत्या. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, अनेक शेतकरी उत्पादक कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात बँक कर्ज घेऊन, तर काहींनी स्वतःची गुंतवणूक करून गोदामांची उभारणी केली आहे. त्यानंतर ही गोदामे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ आणि पुरवठा विभागाला भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्यात आली. मात्र, अनेक वर्षांपासून गोदामांचे भाडे प्रलंबित असल्याने संबंधित कंपन्यांवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला आहे.

निवेदनानुसार, सध्या मिळणारे भाडेदरही अत्यल्प असल्यामुळे गोदामांची देखभाल, प्रशासकीय खर्च, नवीन प्रकल्पांची अंमलबजावणी आणि बँक कर्जाचे नियमित हप्ते भरणे



अनेक कंपन्यांसाठी कठीण झाले आहे. त्यामुळे शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या कामकाजावर विपरीत परिणाम होत असून ग्रामीण भागातील कृषीपूरक उपक्रमांनाही त्याचा फटका बसत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर संवर्धनसृष्टी फार्मर प्रोड्युसर कंपनीसह इतर शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या वतीने प्रलंबित गोदाम भाडे तातडीने अदा करणे, स्टोरेज दरांमध्ये वाढ करणे तसेच कंपन्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी आवश्यक प्रशासकीय निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

प्रेमलता सोनोने यांनी मांडलेल्या या मागणीची केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सकारात्मक दखल घेत संबंधित विभागांशी पाठपुरावा सुरू केला असल्याचे सांगण्यात आले. या मागण्यांवर लवकरच सकारात्मक निर्णय झाल्यास राज्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळेल, अशी अपेक्षा संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींनी व्यक्त केली आहे.

## राज्यातील जवळपास सर्वच शहरांमध्ये खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण होतेय...

पाऊस आणि रस्त्यांवरील खड्डे हे आता जणू समीकरणच बनले आहे. थोडासा पाऊस झाला की रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडतात. दरवर्षी पावसाळ्यात मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, नाशिकसह राज्यातील जवळपास सर्वच शहरांमध्ये खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण होते. यंदाही परिस्थिती वेगळी नाही. काही ठिकाणी तर रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यांत रस्ता, हेच ओळखू येत नाही. ही समस्या केवळ शहरांपुरती मर्यादित नाही. राज्य व राष्ट्रीय महामार्गांवरही मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. मग ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था किती बिकट असेल, याची कल्पनाच केलेली बरी. परिणामी वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. दुचाकीस्वार, रुग्णवाहिका, शालेय बस आणि सामान्य नागरिक यांना रोज जीवघेण्या प्रवासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे दरवर्षी शेकडो अपघात होतात. अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागतो. नाशिकमध्ये खड्ड्यांमुळे चार नागरिकांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत वेदनादायी आहे. केवळ नाशिकच नव्हे, तर देशातील अनेक शहरांमध्ये खड्ड्यांमुळे जीवितहानी होत आहे. तरीही जबाबदार यंत्रणांची संवेदनशीलता जागी होताना दिसत नाही. दरवर्षी शासन रस्ते बांधणी व दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करते. मग एवढा पैसा खर्च होऊनही रस्ते काही महिन्यांतच उखडतात कसे? याचे उत्तर निकृष्ट दर्जाचे काम, भ्रष्टाचार आणि प्रशासनाच्या निष्काळजीपणात दडलेले आहे. ठेकेदार, संबंधित अधिकारी आणि काही लोकप्रतिनिधी यांच्या साटेलोट्यामुळे जनतेचा पैसा अक्षरशः खड्ड्यांत जात आहे. पावसाळ्यात नागरिकांच्या तक्रारी वाढल्या की खड्ड्यांवर तात्पुरते डांबर टाकून दिखाऊ दुरुस्ती केली जाते. काही दिवसांनी पुन्हा तेच खड्डे उघडे पडतात आणि पुन्हा नव्या कामाच्या नावाखाली निधी खर्च होतो. त्यामुळे खड्डे हे काही ठेकेदारांसाठी सोन्याची अंडी देणारी कोंबडी ठरले आहेत, अशी भावना नागरिकांच्या मनात निर्माण होणे स्वाभाविक आहे. यावर कायमस्वरूपी उपाय करायचा असेल तर केवळ घोषणांनी भागणार नाही. ज्या ठेकेदाराच्या कामात दोष आढळतील त्याला काळ्या यादीत टाकले पाहिजे. निकृष्ट कामाला प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. संबंधित लोकप्रतिनिधींनाही जबाबदार धरले पाहिजे. आवश्यक असल्यास निकृष्ट रस्त्यांचा संपूर्ण खर्च दोषींकडून वसूल करण्याची कठोर तरतूद केली पाहिजे. रस्ते हे विकासाचे प्रतीक असतात; पण तेच मृत्यूचे सापळे बनत असतील, तर तो विकास नव्हे, तर व्यवस्थेचा पराभव आहे. शासनाने ठेकेदार, अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या अभद्र युतीवर कठोर कारवाई केली, तरच खड्डेमुक्त महाराष्ट्र हे स्वप्न साकार होईल. अन्यथा दरवर्षी पाऊस पडेल, खड्डे पडतील, अपघात होतील आणि ओशासनेही तशीच पडून राहतील.

# शिक्षण ही कधी न संपणारी साधना : माजी आ. तोतारामजी कायंदे

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ, रुम्हणा संचलित नारायणराव नागरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, दुसरबीड येथे प्राध्यापक डॉ. सर्जेराव रामभाऊ वाघ यांना पीएच.डी. पदवी प्राप्त झाल्याबद्दल जाहीर अभिनंदन व सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा सिंदखेड राजा मतदारसंघाचे माजी आमदार मा. तोतारामजी कायंदे हे उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नागरे( संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे अधिसभा तथा व्यवस्थापन परिषद सदस्य) तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व




विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. विजय नागरे यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेत विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय, राष्ट्रीय व जिल्हास्तरीय विविध क्रीडा स्पर्धांमध्ये मिळविलेल्या यशाची माहिती दिली. तसेच संशोधन क्षेत्रातील डॉ. सर्जेराव वाघ यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करून त्यांच्या पीएच.डी. प्राप्तीबद्दल अभिनंदन केले.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना मा. तोतारामजी कायंदे म्हणाले, शिक्षण ही कधीही न संपणारी साधना आहे. सेवा निवृत्त असतानाही ज्ञानाची भूक कायम ठेवून डॉ. सर्जे राव वाघ यांनी पीएच.डी. प्राप्त केली आहे. त्यांचा हा प्रवास शिक्षकांसह विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून, सातत्य, परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे त्यांनी सिद्ध केले आहे. तसेच त्यांनी डॉ. वाघ यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देत त्यांच्या यशाबद्दल मनः पूर्वक अभिनंदन केले.

सत्काराला उत्तर देताना डॉ. सर्जे राव रामभाऊ वाघ यांनी, संस्थेने केलेल्या या सन्मानामुळे मी ऋणी झालो आहे, अशी भावना व्यक्त केली. आपल्या सेवाकाळात राबविलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती देत पीएच.डी. संशोधन पूर्ण करण्यासाठी ज्येष्ठ मार्गदर्शक, सहकारी व कुटुंबीयांचे लाभलेले सहकार्य त्यांनी कृतज्ञतापूर्वक नमूद केले. शेवटी संस्था, व्यवस्थापन व सर्व सहकाऱ्यांचे त्यांनी आभार मानले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. गणेश घुगे यांनी केले, तर प्रा. मिलिंद गवळी यांनी आभार प्रदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. शिंदे सर, प्रा. तारे सर, प्रा. जगदीश यादव, प्रा. देवानंद, प्रा. युनूस, प्रा. नैना मॅडम, प्रा. खंदारे मॅडम, श्री रणमळे, श्री मुंडे, श्री गायकवाड तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## फळपिक विमा भरपाईतील तांत्रिक अडथळे तातडीने दूर करुन शेतकऱ्यांना त्वरित लाभ द्या – पालकमंत्री नितेश राणे

**सिंधुदुर्गनगरी । प्रतिनिधी :** फळपिक विमा भरपाईपासून केवळ तांत्रिक कारणांमुळे एकही पात्र शेतकरी वंचित राहू नये. विमा कंपनीकडील सर्व त्रुटी तातडीने दूर करून पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाईचे वितरण त्वरित करण्यात यावे, असे निर्देश पालकमंत्री नितेश राणे यांनी दिले.

पालकमंत्री श्री. राणे यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय कृषी विमा कंपनी (अघ्ण) आणि स्कायमेट वेदर कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची फळपिक विमा संदर्भातील आढावा बैठक दिनांक १ ऑगस्ट रोजी पार पडली. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रमोद कामत, जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सतीश सावंत, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी ज्ञानेश्वर बढे, भारतीय कृषी विमा कंपनीचे प्रादेशिक व्यवस्थापक अतुल झणकर, स्कायमेट वेदर सर्व्हिसेसचे राज्य व्यवस्थापक संजय मोरे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत फळपिक विमा योजनेच्या अंम लबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. दरवर्षी फळपिक विम्याची नुकसान भरपाई ऑक्टोबर–नोव्हेंबर महिन्यात वितरित केली जाते. मात्र, शासन व जिल्हा प्रशासनाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे यंदा जिल्ह्यात प्रथमच जुलै महिन्यातच नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली.

विमा कंपनीने कागदपत्रांतील त्रुटींमुळे २ हजार ९६ अर्ज परत पाठविले असून, त्यापैकी सुमारे १ हजार ७५ अर्जांची पूर्तता संबंधित सीएससी (णएण) केंद्रांचे आयडी बंद किंवा ब्लॉक असल्याने होऊ शकलेली नाही. शेतकऱ्यांनी विम्याचा हप्ता भरलेला असताना केवळ तांत्रिक कारणांमुळे त्यांना लाभापासून वंचित राहावे लागू नये. यासाठी संबंधित सीएससी आयडी आणि इतर त्रुटींची तातडीने पूर्तता करून उर्वरित सर्व पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाई वितरित करण्याच्या सूचना पालकमंत्री श्री. राणे यांनी विमा कंपनीला दिल्या.

तापमानातील वाढ व हवामानातील बदलांमुळे नुकसान होऊनही तांत्रिक नोंदींच्या अभावामुळे ज्या महसूल मंडळांना विमा लाभ मिळालेला नाही, त्या ठिकाणच्या हवामान नोंदी आणि स्कायमेटच्या स्वयंचलित हवामान केंद्रांच्या कार्यपद्धतीची सखोल तपासणी करून तांत्रिक पुनर्विलोकन करण्यात यावे, असेही त्यांनी निर्देशित केले.

# सरकारचे ईपीएस-९५ पेंशन धारकांवरील दुर्लक्ष म्हणजे जेष्ठ नागरिकांची खुली थट्टाच!

२०१४ पासुन ईपीएस पेंशन धारक फक्त जगण्याइतकी इतकी पेन्शनची मागणी करीत आहे.परंतु सरकार प्रत्येक अधिवेशनात डोळे बंद करून फक्त तमाशा पहात आहे.जेष्ठ नागरिक ईपीएस पेंशन धारक कमीत कमी ७५०० पेंशन व महागाई भत्ता मिळावा यासाठी वृध्दापकाळात सुध्दा संघर्ष करीत आहे. परंतु सरकारच्या नाकावरील माशी सुद्धा उडतांना दिसत नाही हे जेष्ठांच्या प्रती दुर्भाग्य म्हणावे लागेल.सरकार निवडणुकीच्या काळात मतदारांना लॉलीपॉप देवून अनेक मोफत योजना अंमलात आणते.परंतु देशाचा शिल्पकार कामगार वर्ग फक्त जगण्याइतकी पेन्शनची मागणी करते तेव्हा सरकार प्रत्येक अधिवेशनात पाठ फिरवितांना दिसते.देशात वाढती महागाई,वाढता औषधोपचार, वाढते कर आणि वाढत्या प्रदूषणामुळे वृध्दापकाळातील ढासळते आरोग्य यांनी ईपीएस-९५ पेंशन धारक अत्यंत त्रासलेला असुन ग्रस्त आहे. कारण अल्पशा पेंशनमध्ये पेन्शन धारक कोणतेही काम पूर्ण करूच शकत नाही.यावर सरकारने कानांवर हात ठेवले आहे व तोंडावर बोट ठेवले आहे यावरून स्पष्ट होते की, सरकारला ईपीएस ९५ पेंशन धारकांशी काहीही देणेघेणे नाही.त्यामुळे सरकारला विनंती आहे की,आपण जर या गंभीर समस्येवर तोडगा काढूच शकत नसेल तर स्वेच्छा मरणाची परवानगी दिली पाहिजे.याचे स्वागत आम्ही ईपीएस पेंशन धारक आनंदाने करू. गेल्या १२ वर्षांपासून ईपीएस पेंशन धारक मिनिमम (कमीत कमी) पेंशनची मागणी करीत आहे.या उद्देशाने कमीत कमी जगण्याइतकी तरी पेन्शन जाहीर करावी अशी पेंशनधारकांची केंद्र सरकारकडे अनेक वर्षांपासून मागणी करीत आहे.यावर लोकसभेत व राज्यसभेत अनेक खासदारांनी प्रश्न सुध्दा उपस्थित केले.सोबतच देशातील अनेक संघटनांनी मंत्री,खासदार,आमदार, प्रशासकीय विभाग यांना निवेदनाच्या माध्यमातून सरकारपर्यंत आपले प्रश्न मांडण्याचे काम केले.त्यामुळे या पावसाळी अधिवेशनात सरकारच्या माध्यमातून ईपीएस-९५ बद्दल ठोस निर्णय घेऊन पेंशन धारकांना दिलासा देईल अशी आशा देशातील करोडो वृध्द पेंशन धारकांना वाटत होती.परंतु याही पावसाळी अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशन धारकांच्या पदरी निराशाच आली ही अत्यंत दु:खद आणि चिंताजनक बाब आहे.अनेक वर्षांपासून पेंशन धारकांचा संघर्ष सुरूच आहे.लोकसभा निवडणुकीच्या आधी ईपीएस पेंशन धारकांबद्दल सरकारकडुन चांगली बातमी येण्याचे संकेत होते.परंतु सरकारने पेंशन धारकांच्या पदरी फक्त निराशा दिली.याचे दु:ख करोडो वयोवृद्ध पेंशन धारकांना झाले.तरीही जगण्याइतकी पेंशन दिली पाहिजे याबद्दल अजून पर्यंत सरकारला जाग आलेला नाही. ईपीएस-९५ पेंशनचा मुद्दा कोणत्याही एका पक्षाचा,संघटनेचा किंवा संस्थेचा नसुन सार्वजनिक आहे.केंद्र सरकार मोठमोठ्या गोष्टी करत आहेत परंतु वृध्दांकडे पुर्णतः दुर्लक्ष करीत आहे. ईपीएस-९५ पेंशन धारकांना न्याय मिळेल या आशेने आतापर्यंत उम्मीद टीकुन होती.परंतु सरकार मिनिमम पेंशन बद्दल एकही शब्द बोलायला तयार नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. ईपीएस-९५ पेन्शन बद्दल सरकार सोबत,मंत्र्यांसोबत व अनेक खासदारांसोबत चर्चा होवून सुध्दा सरकार पेन्शन धारकांवर अन्याय करतांना दिसते याचे जिवंत उदाहरण या पावसाळी अधिवेशनात दिसून आले. आज देशातील करोडो ईपीएस-९५ पेन्शन धारकांना कमीत कमी १००० व जास्तीत जास्त ३००० रूपयापर्यंत पेन्शन मिळत असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे.सरकार महागाई वाढवीते तेव्हा कोणाचाही विचार न करता भरमसाठ महागाई वाढविते आणि ईपीएस पेंशन धारक फक्त ७५०० रूपये पेन्शन मागते तेव्हा सरकार पाठ फिरविते ही कुठली लोकशाही म्हणावी.आज सरकारने महागाईचा मोठा डोंगर उभा केला आहे यात सर्वसामान्य व पेंशन धारक दबलेला आहे.यामुळे अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शन धारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही.कारण खाण्यापिण्याचा खर्च, इलेक्ट्रीक बिल, पाण्याचे बिल,घरटॅक्स,वाढती महागाई, वयानुसार औषधोपचार इत्यादी अती आवश्यक सेवा १००० किंवा ३००० रूपयात कशाकाय पुर्ण होणार? हे गांभीर्य सरकारला का दिसत नाही? सरकार एवढी निर्लज्ज का झाली?पेंशन धारकांची मागणी होती की, कमीत कमी ७ हजार ५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व वैद्यकीय सुविधा मिळावी. परंतु वित्त मंत्री निर्मला सिताराम यांनी संपूर्ण ईपीएस-९५ पेंशन धारकांना निराश केल्याचे स्पष्ट दिसून येते आहे.ईपीएस पेन्शन धारकांचा मुद्दा अत्यंत गंभीर, महत्त्वाचा आणि ज्वलंत असल्याचे मी समजतो. हा ज्वलंत मुद्दा असल्याने याची दखल केंद्र सरकारने या पावसाळी अधिवेशनात घेणे गरजेचे होते. परंतु सरकारने याला यत्किंचितही महत्व दिले नाही ही अत्यंत दुःखद बाब आहे. वृद्धांच्या अडीअडचणी पाहून ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न मार्गी लावायला पाहिजे होता परंतु सरकारने पेंशन धारकांना निराश केले.केंद्र सरकारने आतापर्यंत करोडो ईपीएस पेन्शन धारकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. तरीही ६० ते ८०वर्षाच्या म्हाताऱ्या पेन्शन धारकांनी आतापर्यंत शांततेने आंदोलन केले आणि करीत आहे व जगण्याइतकी पेंशनच्या मागणीची आस लावून बसले होते. कारण पेन्शन ही त्यांच्या ''म्हारपणाची शीदोरी'' आहे. त्यामुळे पेन्शन हे ''जीवन-मरणाचे'' साधन सुध्दा आहे. याबाबदची सुध्दा सरकारने जान ठेवली नाही. सरकारने पेन्शन धारकांचा अंत न पाहता कोणत्याही योजनेअंतर्गत कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता आणि वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागु करण्याचा निर्णय आतातरी घ्यावा.आता पेन्शन धारकांच्या प्रश्नावर अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली आहे.देशात अनेक कठीण प्रश्न आहेत यात दुमत नाही आणि सरकार यावर नेहमी तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत असते.परंतु आज १४५ कोटी जनता व राजकीय पुढारी उघडल्या डोळ्यांनी करोडो पेन्शन धारकांच्या वेदना पाहात आहे व दिसत आहे.परंतु सरकार ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या बाबतीत चेहऱ्यावर पांघरूण घेऊन बसले आहे.सरकारच्या तिजोरीत कामगारांच्या घामाचा ''अरबो रूपया'' सरकारजवळ आहे हा पैसा सरकार ''लोकप्रतिनिधींच्या'' पगारासाठी,पेन्शनसाठी व इतरत्र वापरत असतो. परंतु सरकार कामगारांना पेन्शन देवतांना ''भिक'' दील्यासारखी पेंशन देत आहे. ही ''लोकशाहीला'' काळीमा फासणारी व घृणास्पद बाब आहे.याचे दुःख आपल्या पुर्वजांना सुध्दा होत असावे.राजकीय पुढाऱ्यांचे वाढीव पगार,इतर भत्ते व पेन्शन सुरळीत सुरू असतात व सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार वाढले की राजकीय पुढाऱ्यांचे पगार व पेंशन वाढतात याला काय म्हणावे?पेंशन धारकांच्या या घटनेवरून असे दिसुन येते की सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले की काय असे वाटत आहे. केंद्र सरकार पेन्शन धारकांना वाचवीण्यापेक्षा वाऱ्यावर सोडल्याचे काम करीत आहे. परंतु आताही वेळ गेलेली नाही ''देर आज दुरूस्त आए'' ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या मागणीवर सरकारने गांभीर्याने विचार करून अवश्य अंतीम निर्णय घेवून पेन्शन धारकांना दीलासा देवुन त्यांचा मार्ग मोकळा करावा. कारण ईपीएस-९५ पेन्शन धारक प्रत्येक अधिवेशनात पेन्शन वाढण्याची वाट पाहत असतो.परंतु नेहमी त्यांच्या नशिबी नीराशा लागते. ईपीएस पेन्शन धारकांनी गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत अनेक आंदोलने करून रस्त्यावर उतरले.तरीही सरकारचे डोळे उघडले नाही. म्हणजेच केंद्र सरकार ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांबद्दल उदासीन असल्याचे दिसून येते. पावसाळी अधिवेशनात अर्थमंत्री निर्मला सीतारामन ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या जखमेवर फुंकर घालेल असे वाटत होते.परंतु सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले व निराशा हाती आली. ईपीएफओ चा पैसा हा राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्रात जात असतो. त्यामुळे ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांना न्याय देण्याचे काम व दायीत्व केंद्र सरकारचे असते तेवढेच राज्य सरकारचे सुध्दा असते.कारण देशाच्या विकासाकरिता संपूर्ण पैसा हा राज्य सरकारच्या तिजोरीतुन केंद्रात जात असतो.त्यामुळे कामगार व कर्मचाऱ्यांचा ईपीएफओने घेतलेला पैसा गेला कुठे? असाही प्रश्न करोडो पेन्शन धारकांपुढे उपस्थित होतो.त्यामुळे प्रत्येक राज्यातील कामगार व कर्मचारी विचारत आहे की पेन्शन करीता कापलेला पैसा गेला कुठे? ईपीएस १९९५ चे पेन्शन धारक आपल्या हक्काचा पैसा पेन्शनच्या स्वरूपात सरकारला मागत आहे.परंतु सरकार यावर मात्र मौन धारण केल्याचे दिसून येते. म्हणजेच आज पेन्शन धारकांची परीस्थिती अशी झाली आहे की ''आपलाच पैसा आपणच चोर''. त्यामुळे ईपीएस १९९५ च्या पेन्शन धारकांसमोर प्रश्न आहे की ''जगावे की मरावे''अशी गंभीर परिस्थिती आज ईपीएस पेन्शन धारकांची झाली आहे. त्यामुळे सरकारने ईपीएस पेन्शन धारकांना कमीत कमी ७५०० रूपये पेन्शन, महागाई भत्ता व इतर सुविधा लागू करून पेन्शन धारकांना योग्य न्याय सरकारने द्यावा. पेंशनधारक आशावादी आहेत. त्यामुळे पेन्शन धारकांना विश्वास आहे की ईपीएस-९५ पेन्शन धारकांचा प्रश्न अवश्य सुटेल.पेंशन धारकांची ही लढाई अंतिम आहे. ईपीएस पेन्शन धारक चिंतेने मरत आहे, महागाई वाढत आहे, आर्थिक परिस्थिती नाजूक होत आहे.सुप्रिम कोर्टाचेही म्हणने आहे की ईपीएस पेन्शन धारकांना मीळणारी पेन्शन ही तुटपुंजी आहे. त्यामुळे जगण्याइतकी पेन्शन मिळायलाच पाहिजे. शेतकरी हा ज्याप्रमाने देशाचा अन्नदाता आहे त्याचप्रमाणे देशाचा कामगार हा ''शिल्पकार'' आहे याची जाण केंद्र सरकारने ठेवली पाहिजे. राजकीय पुढारी मोठ्या ऐटीने सांगतात की समान हक्क,समान न्याय, समान अधिकार मग ईपीएस पेन्शन धारकांच्या पेन्शनमध्ये व राजकीय पुढाऱ्यांच्या पेन्शन, पगार यात तफावत का? असाही प्रश्न सर्वसामान्यांसमोर उपस्थित होतो. केंद्र सरकारने ज्याप्रमाणे आठव्या वेतन आयोग स्थापनेला मंजुरी दिली. त्याचप्रमाणे ईपीएस-९५ पेंशन बद्दल सरकारने ठोस निर्णय घेतला पाहिजे. मी केंद्र सरकारला विनंती करतो की आपण अनेक योजना अंमलात आणल्यात त्याचे मनापासून स्वागत.परंतु २०१४ पासून प्रलंबित असलेला व लोकसभेत पक्ष-विपक्षाच्या अनेकदा खासदारांनी उचललेला ईपीएस-९५ चा पेंशनचा मुद्दाला गांभीर्याने घेऊन कमीत कमी ७५०० रूपये पेंशन जाहीर करून अवश्य मार्गी लावेल अशी आशा देशाच्या करोडो पेंशन धारकांना आहे.सरकारला यावर काहीच निर्णय घ्यायचा नसेल तर ईपीएस पेंशन धारकांना सरकारने स्वेच्छा मरणाची परवानगी द्यावी याचेही आम्ही स्वागत करू.जय हिंद!जय भारत.



लेखक.
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### लग्न मोडल्याचा सूड! मामाच्या १ वर्षीय बाळाचे अपहरण; डोंबिवलीत बंद रिक्षात सोडून भाचा फरार



दैनिक आपला विदर्भ

**डोंबिवली । प्रतिनिधी :** मुंबई आणि डोंबिवलीत नात्याला काळिमा फासणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. मामाने लग्नाला विरोध करून सोयरिक मोडल्याच्या रागातून मूकबधिर भाच्याने मामाच्या अवघ्या एका वर्षाच्या मुलाचे अपहरण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. कुर्ला परिसरातून अपहरण करून नेलेल्या या चिमुकल्याला आरोपीने डोंबिवलीतील कोपर परिसरातील एका बंद रिक्षामध्ये सोडून पलायन केले. मात्र, पोलिसांच्या सतर्कतेमुळे हे बाळ सुरक्षितरित्या आढळून आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, आरोपीचा शोध पोलीस घेत असून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

### पारंपरिक पद्धतीने पुस्तक वाचनाचा आनंद हरवू नये - राज्यपाल जिष्णु देव वर्मा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई। प्रतिनिधी :** गिरगाव येथील आर्यन हायस्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक नीलकंठ नामजोशी यांनी आज राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन, मुंबई येथे भेट घेऊन त्यांनी आपण लिहिलेल्या तीन पुस्तकांचा संच भेट दिला.राज्यपाल म्हणाले की, जेव्हा लेखक पुस्तक लिहितो, तेव्हा तो आपल्या विचारांना पंख देतो व जगाच्या ज्ञानात भर घालतो. पुस्तक कधीही मरत नाही. लेखक समाजाला काहीतरी परत देत असतो. एकमेकांना भेटताना पुष्पगुच्छ न देता पुस्तके दिली पाहिजे, असे राज्यपालांनी सांगितले.

महाराष्ट्र ही संत आणि वीरांची भूमी आहे. राज्यात लेखकांची देखील एक मोठी परंपरा आहे. आज आपण ई-पुस्तकांच्या युगात वावरत असलो तरी देखील पारंपरिक पुस्तक वाचनाचे महत्व वेगळे आहे व पुस्तक वाचनाचा आनंद कायम आहे. नव्या युगात पारंपरिक पुस्तक वाचनाचा आनंद हरवू नये, अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली.

नामजोशी यांनी राज्यपालांना 'मोगरा फुलाला दारी' हा कथासंग्रह, 'स्मृतिगंध' हे समाजातील गणमान्य व्यक्तींशी केलेल्या पत्रव्यवहाराचे संकलन असलेले पुस्तक तसेच 'भीमा' ही आदिवासी मुलीच्या कर्तृत्वाची व तिच्या आईच्या त्यागाची कहाणी असलेली कादंबरी भेट दिली. यावेळी नामजोशी यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

### ...तर ते अडचणीत येतील, संजय राऊतांचा मंत्री जयकुमार गोरेंना इशारा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई। प्रतिनिधी :** उद्धव ठाकरे गटाचे नेते आणि राज्यसभा खासदार संजय राऊत आणि राज्याचे ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री जयकुमार यांच्यातील वाद शिगेला पोहोचला आहे. जयकुमार गोरेंविरोधात अवमानकारक व्यक्तव्य केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यानंतर आता संजय राऊतांनी गोरेंविरोधात टीका केली आहे. जयकुमार गोरे यांनी देखील कोण संजय राऊत म्हणत? प्रतिक्रिया देण्यास टाळले होते. यावर आता राऊतांनी जयकुमार गोरेंना दूर राहण्याचा सल्ला देत जवळ फिरकल्यास अडचणीत याल, असा इशारा दिला आहे.

गुन्ह्याबाबत माहिती नाही - राऊत

सोलापूरमध्ये दाखल झालेल्या गुन्ह्याबाबत राऊतांना विचारण्यात आले. ''राजकीय कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल होत असतात, कशासाठी गुन्हा दाखल झालाय? मला कल्पना नाही. सरकारमधील लोकं स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य मानण्यास तयार नाहीत. त्यामुळे शब्दांनी अपशब्दाचे अवरण चढवून गुन्हे दाखल केले जातात. किंती गुन्हे दाखल करणार? आंदोलकांवर गुन्हे दाखल केले म्हणून ते घाबरले?,'' असा सवाल राऊतांनी उपस्थित केला. संजय राऊतांनी रविवारी जयकुमार गोरे यांच्या अटकेच्या बातमीचा एक फोटो सोशल मीडियावरुन शेअर करत टीका केली होती. याबाबतही राऊतांना विचारण्यात आले.

जयकुमार गोरे यांनी उद्धव ठाकरे यांच्याबाबत केलेले वक्तव्य सभ्येत्याच्या कोणत्या चौकटीत बसते? उद्धव ठाकरे राज्याचे माजी मुख्यमंत्री आहेत. ते बाळासाहेब ठाकरे यांचे सुपुत्र आहेत, शिवसेनाप्रमुख आहेत. तुम्ही त्यांच्याबद्दल काहीही वक्तव्य करायचं आणि आम्ही त्याला प्रत्युत्तर दिल्यानंतर तुम्ही गुन्हे दाखल करायचं याला हुकूमशाही म्हणतात. आज सत्ता आहे म्हणून गुन्हे दाखल केले जात आहेत. उद्या सत्ता नसेल त्यावेळेस काय कराल? याचं त्यांनी आत्मचिंतन केलं पाहिजे'', असे संजय राऊत गोरेंवर टीका करताना म्हणाले.

# राष्ट्रीय स्तरावर शालेय शिक्षणात महाराष्ट्राचे महत्त्वपूर्ण स्थान - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ■ राज्यातील शालेय शिक्षण क्षेत्रात अभिनव उपक्रमांची अंमलबजावणी
## ■ शालेय अभ्यासक्रमात नशामुक्तीच्या अनुषंगाने पाठ्यक्रमाचा समावेश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई। प्रतिनिधी :** शिक्षणाची गुणवत्ता, मातृभाषेचे संवर्धन, इतिहासाची समृद्ध परंपरा आणि आधुनिक शैक्षणिक सुविधा यांचा समतोल साधत राज्य शासन विद्यार्थीकेंद्रित शिक्षणव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असून राष्ट्रीय स्तरावरही महत्त्वपूर्ण स्थान राखून आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. यावेळी शालेय अभ्यासक्रमात नशामुक्तीच्या अनुषंगाने पाठ्यक्रमाचा समावेश करण्यासाठी कार्यवाही करावी अशा सूचना त्यांनी दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी शिक्षण विभागाचा आढावा घेतला यावेळी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीतसिंग देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव श्रीकर परदेशी व शिक्षण विभागातील प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र पीजीआय २.० मध्ये देशात दुसऱ्या स्थानावर कायम आहे. राज्यात पीएम श्री शाळांसह सर्व शाळांमधून चांगले शिक्षण दिले जात आहे. शिक्षण क्षेत्रात अभिनव उपक्रमांची अंमलबजावणी करावी, असे त्यांनी सांगितले. राज्यातील विद्यार्थ्यांचे शालेय आधार प्रमाणीकरण, आरटीइद्वारे ३५ लाख विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधेचा लाभ, पवित्र पोर्टल, राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी, यासह विविध शैक्षणिक उपक्रमांची त्यांनी यावेळी माहिती घेतली.

राज्य शासनाने शाळांमध्ये नशाविरोधी मार्गदर्शक व समुपदेशन समित्या स्थापन करण्याचा आणि 'ड्रग-फ्री स्कूल' अभियान राबवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. शाळांमधील सुरक्षा, सायबर फसवणूक आणि अमली पदार्थ प्रतिबंधासाठी प्रभावी व कठोर उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

**राज्यातील विद्यार्थी- शिक्षक प्रमाण - २८ : १**

देशातील एकूण शाळांपैकी ९.३४ टक्के, शिक्षकांपैकी ८.८४ टक्के आणि विद्यार्थ्यांपैकी ७.६९ टक्के वाटा महाराष्ट्राचा आहे. राज्यातील १,०८,०६५ एकूण शाळा मध्ये २,२०,४८,४४३ विद्यार्थी शिक्षण घेत असून विद्यार्थी-शिक्षक प्रमाण २८ : १ आहे. राज्यातील शाळांमध्ये ६४,३४१ शासकीय, २९,४८६ खासगी अनुदानित आणि उर्वरित स्वयंअर्थसहाय्यित तसेच केंद्रीय शाळा आहेत. शालेय शिक्षण व्यवस्थेचा विस्तार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी राज्य शासन विविध स्तरांवर सुधारणा राबवत आहे. निपुण महाराष्ट्र अभियान, राष्ट्र प्रथम अभियान, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा सारखे उपक्रम विद्यार्थ्यांना शाळेमध्ये आणण्यासाठी शाळा प्रवेशोत्सव सारखे कार्यक्रम याबद्दल यावेळी माहिती देण्यात आली.

यावेळी मंत्री दादाजी भुसे यांनी सादरीकरणाद्वारे विभागाच्या वतीने करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती दिली. शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी शाळांमध्ये नशामुक्ती आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या संदर्भात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे, असे सांगितले.

शिक्षकांसाठी एआयसाथीच्या माध्यमातून ऑनलाइन प्रशिक्षण देखील राबविण्यात आले आहे. शिक्षकांचे अभ्यास दौरे, चांगले काम करणाऱ्या शिक्षण समित्या व शिक्षकांच्या



सहभागाने उपक्रमांना चालना, दत्तक शाळा, सीएसआर-सामंजस्य कराराच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात नवीन विचार देखील सुरू झाला आहे. यातूनच शासकीय शाळांमध्ये सुपर १०० योजना राबविण्यात येत आहे. यामध्ये प्रत्येक जिल्ह्यातील ग्रामीण भागातील गुणवान शंभर विद्यार्थ्यांना नीट, जेईई परीक्षांचे स्पर्धात्मक चांगल्या दर्जाचे प्रशिक्षण देण्यासाठी निवड केली जाईल.

राज्य शासनाच्या प्रयत्नामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली इतिहासाला केंद्र सरकारच्या वतीने एनसीईआरटीच्या पाठ्यपुस्तकात विस्तृत स्थान देण्यात आले आहे. अभ्यासक्रमात याचा अधिक व्यापक समावेश करावा, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. यासोबतच राज्यातील सर्व शिक्षण मंडळांच्या (एसएससी, सीबीएसई, आयसीएसई, आयबी) शाळांमध्ये मराठी भाषा शिकविणे व मराठी विषयाची परीक्षा घेणे सक्तीचे केले आहे, याबाबत यावेळी माहिती देण्यात आली.

# एक-दोन नव्हे, तब्बल १३ बिबटे आणि तीन अस्वलांना ठार मारण्याचे आदेश

दैनिक आपला विदर्भ





**नागपूर । प्रतिनिधी :** उत्तराखंडमध्ये वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षामुळे राज्य सरकारने कठोर पाऊल उचलत १३ बिबटे आणि तीन अस्वलांना गोळ्या घालण्याचे आदेश दिले आहेत. संबंधित प्राण्यांनी वारंवार मानवी वस्त्यांमध्ये घुसून हल्ले केल्याने त्यांना 'मानवी जीवितासाठी धोकादायक' घोषित करण्यात आले आहे. भूल देऊन पकडण्याचे अनेक प्रयत्न निष्फळ ठरल्यानंतर अखेर हा निर्णय घेण्यात आल्याचे वनविभागाने स्पष्ट केले.

वनविभागाच्या आकडेवारीनुसार, राज्यात सध्या मानव-वन्यजीव संघर्षाशी संबंधित ११७ गंभीर प्रकरणे हाताळली जात आहेत. त्यामध्ये ८९ बिबटे, २१ वाघ आणि आठ अस्वलांचा समावेश आहे. या प्राण्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष पथके, ट्रॅप कॅमेरे, पिंजरे आणि ड्रोनचा वापर केला जात असून अनेक भागांत वन कर्मचाऱ्यांची गस्त वाढविण्यात आली आहे. वनअधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ज्या बिबट्यांना किंवा अस्वलांना गोळ्या घालण्याचे आदेश देण्यात आले आहेत, त्यांनी अनेक वेळा माणसांवर हल्ले केले किंवा मानवी वस्त्यांमध्ये वारंवार प्रवेश केला होता. त्यांना प्रथम भूल देऊन पकडण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र हे प्रयत्न अपयशी ठरल्याने आणि नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याने वन्यजीव संरक्षण कायद्यातील तरतुदीनुसार त्यांना ठार मारण्याची परवानगी देण्यात आली.

१० वर्षात ३२७ माणसे मृत्युमुखी

उत्तराखंडमध्ये बिबट्यांच्या हल्ल्यांचे प्रमाण गेल्या काही वर्षांत सातत्याने वाढत आहे. राज्य सरकारच्या माहितीनुसार, गेल्या दहा वर्षांत वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांत ३२७ नागरिकांचा मृत्यू झाला असून हजारो जण जखमी झाले आहेत. यामध्ये बिबट्यांमुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण सर्वाधिक आहे. अनेक डोंगराळ जिल्ह्यांमध्ये नागरिकांना संध्याकाळनंतर घराबाहेर पडणे धोकादायक ठरत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. मानव-वन्यजीव संघर्षामागे जंगलांचे आकुंचन, अधिवासाचे तुकडीकरण, वाढती मानवी वस्ती, जंगलातील नैसर्गिक भक्ष्याची कमतरता आणि गावांमधील कचरा व पाळीव जनावरे ही प्रमुख कारणे असल्याचे वन्यजीव तज्ज्ञ सांगतात. जंगलालगतच्या भागात बिबट्यांना सहज भक्ष्य उपलब्ध होत असल्याने ते वारंवार मानवी वस्त्यांकडे वळत आहेत. अलीकडील काळात जंगलातील वणवे आणि विकास प्रकल्पांमुळेही वन्यप्राण्यांचा अधिवास बाधित झाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

वन्यप्राण्यांना ठार मारणे हा अखेरचा पर्याय

दरम्यान, वन्यजीव संरक्षण क्षेत्रातील काही तज्ज्ञांनी या निर्णयाबाबत चिंता व्यक्त केली आहे. अशा प्रकरणांत प्राण्यांना ठार मारणे हा अखेरचा पर्याय असावा, त्याऐवजी संघर्ष टाळण्यासाठी अधिवास व्यवस्थापन, भक्ष्यसाखळी मजबूत करणे, गावांमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि नागरिकांमध्ये जनजागृती यावर अधिक भर देण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. उत्तराखंडमधील वाढता मानव-वन्यजीव संघर्ष हा केवळ त्या राज्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य प्रदेश आणि हिमालयीन राज्यांमध्येही बिबटे, वाघ व अस्वलांच्या मानवी वस्त्यांमधील वावरात वाढ होत असल्याने वन्यजीव संवर्धन आणि मानवी सुरक्षितता यामधील समतोल राखण्याचे आव्हान अधिक गंभीर बनले आहे.

### जम्मू-काश्मीरच्या बारामुल्लामध्ये दहशतवाद्यांच्या दोन साथीदारांना अटक; शस्त्रे आणि दारूगोळा जप्त

श्रीनगर : सुरक्षा दलांनी जम्मू-काश्मीरमधील बारामुल्ला आणि पुलवामा जिल्ह्यांतून दोन 'ओव्हरग्राउंड वर्कर्स'ना म्हणजेच दहशतवाद्यांना रसद पुरवणाऱ्या साथीदारांना अटक केली आहे. त्यांच्याकडून शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे. त्यांच्या 'हँडलर्स'ची (सूत्रधारांची) ओळख पटवण्यासाठी पोलीस त्यांची चौकशी करत आहेत. अधिकाऱ्यांनी रविवारी ही माहिती दिली.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, एजाज अहमद गनाई या आरोपीला पोलीस, लष्करी आणि निमलष्करी दलांच्या संयुक्त पथकाने मध्यरात्री बारामुल्लामधील शिरी भागातील गोरीवान येथे एका फिरत्या वाहन तपासणी नाक्यावर पकडले. सुरक्षा दलांनी त्याच्याकडून एक पिस्तूल, एक मॅगझिन, १० जिवंत काडतुसे (९ मिमी) आणि एक मोबाईल फोन जप्त केला असून, या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका स्वतंत्र कारवाईत सुरक्षा दलांनी पुलवामा जिल्ह्यातील राजपोरा भागात तपासणीदरम्यान आणखी एका साथीदाराला अटक केली. तौसीफ अहमद दार याच्याकडून हँड ग्रेनेड आणि आक्षेपार्ह पोस्टर्स जप्त केल्यानंतर त्याला अटक करण्यात आलीय. त्याच्यावर कायद्याच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. पोलीस त्याच्या नेटवर्कमध्ये सामील असलेल्या इतर व्यक्तींची ओळख पटवण्याचाही प्रयत्न करत आहेत. विशेष म्हणजे जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादाला खतपाणी घालण्यात दहशतवाद्यांच्या साथीदारांची भूमिका महत्त्वाची असते, असे सुरक्षा दलांचे मानणे आहे; त्यामुळेच अशा साथीदारांना लक्ष्य केले जात आहे.

# राष्ट्रवादीच्या संविधानावर निवडणूक आयोगाचा सवाल; सुनेत्रा पवारांकडून मागवला खुलासा

दैनिक आपला विदर्भ



मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत घडामोडींना पुन्हा वेग आला आहे. पक्षाच्या संविधानात करण्यात आलेल्या दुरुस्त्यांबाबत भारत निवडणूक आयोगाने पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांना पत्र पाठवून आवश्यक कागदपत्रे आणि सविस्तर स्पष्टीकरण सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

निवडणूक आयोगानं पक्षाच्या सुधारित संविधानासंदर्भातील विविध मुद्द्यांवर खुलासा मागितला आहे. संविधानातील दुरुस्त्या कोणत्या प्रक्रियेनुसार करण्यात आल्या, त्या मंजूर करणारे ठराव, राष्ट्रीय कार्यकारिणीची रचना, बैठकींचे इतिवृत्त, सदस्यांची यादी तसंच इतर अधिकृत कागदपत्रे सादर करण्यास आयोगानं सांगितलं आहे. आयोगाकडे उपलब्ध असलेल्या नोंदी आणि पक्षाने यापूर्वी सादर केलेल्या माहितीत काही विसंगती आढळल्यानं हा खुलासा मागवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पक्षाच्या संघटनात्मक निर्णयप्रक्रिया, संविधानातील बदल आणि नेतृत्वासंदर्भातील घडामोडी पुन्हा चर्चेत आल्या आहेत.

संविधानातील दुरुस्त्यांबाबत आयोगाचा खुलासा : पक्षानं निवडणूक आयोगाला सादर केलेल्या माहितीनुसार, संविधानातील कलम ६, ७, १२, १८(१), ३२ आणि ३६ मध्ये दुरुस्त्या करण्यात आल्याचं नमूद करण्यात आलं आहे. मात्र, आयोगाकडे सादर करण्यात आलेल्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या ठरावात केवळ कलम १८(१) मधील बदलाचा उल्लेख असल्याचं निदर्शनास आलं आहे.

यामुळे उर्वरित कलमांमध्ये दुरुस्त्या कोणत्या बैठकीत, कोणत्या ठरावाद्वारे आणि कोणत्या प्रक्रियेनुसार करण्यात आल्या? यासंबंधीचे पुरावे आणि संबंधित कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश आयोगानं दिले आहेत. आवश्यक कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतरच सुधारित संविधानाबाबत पुढील निर्णय घेतला जाईल, असं आयोगानं स्पष्ट केलं आहे.

नेतृत्वाच्या मुद्द्यावरून वाद : वास्तविक, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेल्या काही महिन्यांपासून नेतृत्वाच्या मुद्द्यावरून मतभेद समोर येत आहेत. राष्ट्रीय अध्यक्षा म्हणून सुनेत्रा पवार यांच्या निवडीवर काही पदाधिकाऱ्यांनी आक्षेप घेत ही प्रक्रिया पक्षाच्या संविधानाशी सुसंगत नसल्याचा दावा केला होता. यासंदर्भात निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर आयोगानं या प्रकरणाची दखल घेत संबंधित कागदपत्रे आणि स्पष्टीकरण मागवलं आहे.

पक्षानं काय सांगितलं? : दरम्यान, या पत्राला अनावश्यक राजकीय रंग देऊ नये, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उमेश पाटील यांनी मांडली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, निवडणूक आयोग आणि राजकीय पक्षांमध्ये विविध प्रशासकीय कारणांमुळे नियमितपणे पत्रव्यवहार होत असतो. आयोगाकडून वेळोवेळी विविध कागदपत्रे आणि माहिती मागवली जाते. सध्याचं पत्रही त्याच नियमित प्रक्रियेचा भाग असून, त्यामागे कोणतंही विशेष कारण नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. आयोगानं मागितलेली सर्व माहिती आणि आवश्यक कागदपत्रे नियमानुसार सादर केली जातील, असंही त्यांनी सांगितलं. मात्र, संविधानातील दुरुस्त्यांबाबत आयोगानं थेट स्पष्टीकरण मागवल्यानं या घडामोडींना राजकीय महत्त्व प्राप्त झालं आहे.

विश्लेषकांचे मत : राजकीय विश्लेषक शैलेश परांजपे यांच्या मते, कोणत्याही मान्यताप्राप्त राजकीय पक्षानं संविधानात बदल केल्यास त्याची अधिकृत नोंद, संबंधित ठराव आणि आवश्यक कागदपत्रे निवडणूक आयोगाकडे सादर करणं बंधनकारक असतं. त्यामुळे आयोगानं अतिरिक्त कागदपत्रांची मागणी करणं ही नियमित प्रशासकीय प्रक्रिया असली, तरी पक्षात सुरू असलेल्या अंतर्गत मतभेदांच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

आता पुढे काय? : यापूर्वीही राष्ट्रवादी काँग्रेसमधील नेतृत्वाच्या वादाची चर्चा झाली होती. गेल्या महिन्यात पक्षाचे ज्येष्ठ नेते सच्चिदानंद सिंह यांनी सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रीय अध्यक्षा पदाच्या निवडीला आव्हान देत नोटीस बजावली होती. राष्ट्रीय अध्यक्षापदाची निवड प्रक्रिया पुन्हा राबवावी, अशी मागणी त्यांनी केली होती. आता राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक आयोगाकडे कोणती कागदपत्रे सादर केली जातात, त्यांची आयोगाकडून कशी पडताळणी केली जाते आणि त्यानंतर आयोग कोणता निर्णय घेतो? याकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे.

## वृत्तविशेष...

### झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांची अंमलबजावणी गतिमान करावी – राज्यमंत्री माधुरी मिसाळ

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई। प्रतिनिधी :** पुणे व मुंबई येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची अंमलबजावणी अधिक गतिमान, पारदर्शक आणि परिणाम कारक करण्यात यावी. यासाठी प्रायोगिक तत्त्वावर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि महाप्रीत यांच्या माध्यमातून या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

या बैठकीस पुणे महाप्रीत चे व्यवस्थापकीय संचालक बिपीन श्रीमाळी, पुणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीशकुमार खडके, गृहनिर्माण विभागाचे उपसचिव चंद्रशेखर तरंगे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत पुणे व मुंबई येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला.

योजनांच्या प्रभावी नियोजनासाठी सल्लागार संस्था निश्चित करुन पुढील कार्यवाही निश्चित करणे, सुरू असलेल्या योजनांचे सर्वेक्षण, क्षेत्रनिहाय तपशीलांचे परीक्षण तसेच क्षेत्र दुरुस्ती आणि दृश्य पडताळणी यांसह विविध तांत्रिक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक आणि गतिमान करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी, म्हाडा तसेच संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय राखून आवश्यक कार्यवाही वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना राज्यमंत्री मिसाळ यांनी दिल्या.

आवश्यक सर्वेक्षण पूर्ण करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा आणि विकासकामे निर्धारित कालमर्यादेत प्रभावीपणे पूर्ण होतील, यासाठी प्राधान्याने कार्यवाही करावी, असे निर्देशही राज्यमंत्री मिसाळ यांनी दिले.

### तेनझिंग नॉर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कारासाठी २० ऑगस्टपर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई। प्रतिनिधी :** तेनझिंग नॉर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कार २०२५ साठी २० ऑगस्ट २०२६ पर्यत केंद्र शासनाच्या https://fellowship.trti-maha.in या पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन मुंबई शहरच्या जिल्हा क्रीडा अधिकारी नीलिमा अडसूळ यांनी केले आहे. साहसी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयातर्फे हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या पुरस्कारांतर्गत जमिनीवरील, समुद्रावरील आणि हवाई साहसी उपक्रमांसाठी प्रत्येकी एक पुरस्कार दिला जातो. तसेच साहसी क्षेत्रातील आजीवन योगदान यासाठीही स्वतंत्र पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

या पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या साहसी खेळाडूंची कामगिरी २०२३, २०२४ आणि २०२५ या तीन वर्षातील असणे आवश्यक आहे. तसेच संबंधित कामगिरी जमीन, पाणी किंवा हवाई साहसी उपक्रमांमधील असून ती अतिउत्कृष्ट स्वरूपाची असावी.

पुरस्कारासाठीची नामांकने २० ऑगस्ट २०२६ पर्यत केवळ केंद्र शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर स्वीकारली जाणार असून, ऑफलाइन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. त्यामुळे पात्र साहसी खेळाडूंनी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

### वाढदिवसानिमित्त प्रसिद्ध अभिनेता सुनील ग्रोव्हर साईचरणी नतमस्तक....

**शिर्डी । प्रतिनिधी :** प्रसिद्ध अभिनेता आणि विनोदवीर सुनील ग्रोव्हरनं आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून आज शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. तसेच आगामी वाटचालीसाठी साईबाबांचा आशीर्वाद घेतला. यावेळी साईबाबा संस्थानच्या वतीनं सुनील ग्रोव्हर यांचा साईबाबांची मूर्ती आणि शाल देऊन सत्कार करण्यात आला.

साईबाबांच्या दर्शनानंतर पत्रकारांशी संवाद साधताना सुनील ग्रोव्हरनं म्हटलं की, ''माझा वाढदिवस साईबाबांच्या दरबारात साजरा करण्याचे भाग्य मला आज लाभले. याचा मला अत्यंत आनंद आहे. मी साईबाबांचे आभार मानण्यासाठी आणि आशीर्वाद घेण्यासाठी येथे आलो आहे. मी आज साईबाबांकडे खूप काही मागितले आहे आणि साईबाबांनी मला भरभरून दिले आहे. गेल्या २३ वर्षांपासून मी शिर्डी साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येत आहे. मात्र आज माझ्या वाढदिवसानिमित्त साईबाबांच्या दर्शनासाठी येण्याचे भाग्य मला लाभले. याचा मला अत्यंत आनंद आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराचा उत्साहात शुभारंभ

# शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली : आ. संजय गायकवाड

**दैनिक आपला विदर्भ**






**बुलढाणा। प्रतिनिधी :** सर्वसामान्य नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ सुलभपणे मिळावा आणि शासकीय कार्यालयांचे वारंवार हेलपाटे मारावे लागू नयेत, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे प्रतिपादन आमदार संजय गायकवाड यांनी केले. या शिबिराच्या माध्यमातून विविध शासकीय विभागांच्या सेवा व योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देत नागरिकांच्या समस्यांचे त्वरित निवारण करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

आराध्या लॉन्स येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी नगराध्यक्ष पूजा गायकवाड, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, तहसीलदार विठ्ठल कुंभरे तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि लाभार्थी, नागरिक उपस्थित होते.

आमदार गायकवाड म्हणाले, समाधान शिबिरामुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचत असून विविध दाखले, प्रमाणपत्रे आणि शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळत आहे. शासनाच्या सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. शहर व परिसर झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून घरकुलाच्या माध्यमातून त्यांना हक्काचे घर दिल्या जात आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी पांदण रस्त्यांचे जाळे मजबूत करण्यावर भर दिला जात आहे. पांदण रस्त्यांमुळे शेतीमालाच्या वाहतुकीला गती मिळून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

संभाव्य हवामान बदल आणि अल-निनोच्या पार्श्वभूमीवर जलनियोजनाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी अटल भूजल योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचे सांगितले. तसेच वैनगंगा नदीचे पाणी नळगंगा प्रकल्पात आणून जिल्ह्यातील अधिकाधिक क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचा शासनाचा संकल्प असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना अंतर्गत जिल्ह्यातील सुमारे दोन लाख २७ हजार शेतकऱ्यांना लाभ मिळणार असून पात्र शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅकवर नोंदणी करून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी आमदार संजय गायकवाड व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्राथमिक स्वरुपात साहित्य, धनादेश, लाभ प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. शिबिराच्या माध्यमातून नागरिकांच्या आणि शेतकऱ्यांच्या दैनंदिन समस्यांचे तातडीने निराकरण होत असल्याने उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## क्रातिसिंह नाना पाटील यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**बुलढाणा । प्रतिनिधी :** क्रातिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## महिन्याभरापूर्वी आई गेली अनब मुलावरही काळाचा घाला! मिरवणुकीत भरधाव ट्रकने चिरडलं

**नाशिक । प्रतिनिधी :** अवघ्या महिन्याभरापूर्वीच डोक्यावरचं आईचं छत्र हरपलं होतं, त्या दु:खातून सावरत २४ वर्षांचा तरुण कसंतरी जगण्याची उमेद धरत होता. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीच्या मिरवणुकीत उत्साहाने सहभागी झाला होता. पण, नियतीच्या मनात काही वेगळंच होतं. या तरुणावरही काळानं झडप घातली आणि क्षणात सगळं संपलं. मिरवणुकीचा आनंद काही क्षणांत किंकाळ्यांमध्ये बदलला आणि २४ वर्षांच्या तरुणीने जागीच जीव सोडला.शनिवारी सायंकाळी नांदगावात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अत्यंत उत्साहात मिरवणूक काढण्यात आली होती. गांधीनगर येथील सुनील साठे हा २४ वर्षीय तरुणही या मिरवणुकीत मोठ्या उत्साहाने सहभागी झाला होता. मिरवणूक नगरपरिषदेच्या जलकुंभाजवळील येवला रस्त्यावरून जात असताना, तिथे असलेल्या स्पीड ब्रेकरवरुन येवल्याच्या दिशेने जाणारा हरियाणा पासिंगचा एक ट्रक जात होता. याच वेळी अचानक सुनील गतिरोधकाजवळ चालत्या ट्रकच्या चाकाखाली सापडला. काही समजायच्या आत सुनीलचा ट्रकखाली चिरडून मृत्यू झाला. हा भयानक प्रकार पाहताच मिरवणुकीत गोंधळ उडाला, परिसरात शोककळा पसरली आहे.

## ३ ते १५ ऑगस्टदरम्यान जनजागृतीचे विविध उपक्रम; अवयवदान-जीवनदानाचा सर्वोत्तम संकल्प अभियानाला सुरुवात

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा । प्रतिनिधी :** सार्वजनिक आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार बुलढाणा जिल्ह्यात ३ ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत 'अवयवदान पंधरवडा' साजरा करण्यात येत असून, सोमवारी (दि. ३) जिल्हा शासकीय रुग्णालयात अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. यावर्षी अवयवदान-जीवनदानाचा सर्वोत्तम संकल्प या संकल्पनेवर आधारित विविध जनजागृती उपक्रम जिल्हाभर राबविण्यात येणार आहेत.

अवयवदानाबाबत समाजामध्ये जागरूकता निर्माण करणे, त्यासंदर्भातील गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करणे तसेच अधिकाधिक नागरिकांना अवयवदानासाठी प्रेरित करणे हा या पंधरवड्याचा मुख्य उद्देश आहे. अवयवदानामुळे अनेक गंभीर रुग्णांना नवजीवन मिळू शकते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने समाजहिताच्या या कार्यात सहभागी होऊन अवयवदानाचा संकल्प करावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले.

शुभारंभ कार्यक्रमाला जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले, कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. रवी शिंदे, डॉ. कल्पना इंगळे, डॉ. भिलावेकर, नोडल अधिकारी अविनाश चिंचोले, नेत्रदान समुपदेशक योगेश सिरसाट, डॉ. अमोल उगले, सौरभ हिवाळे, डॉ. देशमुख, स्टाफ नर्स, जिल्हा माहिती, शिक्षण व माध्यम अधिकारी तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पंधरवड्यानिमित्त जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्था, वैद्यकीय महाविद्यालये, शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था तसेच सामाजिक व धार्मिक संस्थांच्या सहभागातून जनजागृती रॅली, शपथविधी, व्याख्याने, चर्चासत्रे, पोस्टर व घोषवाक्य स्पर्धा, आरोग्य शिक्षण, समाजमाध्यमांद्वारे जनजागृती तसेच अवयवदानाविषयी यशोगाथा आणि अनुभव कथन यांसारखे विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

याशिवाय, अवयवदानासाठी कार्यरत संस्थांच्या समन्वयातून नागरिकांना अवयवदानाची प्रक्रिया, त्याचे महत्त्व आणि कायदेशीर बाबींबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका तसेच सामाजिक संस्थांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

## रक्षाबंधनासाठी भारतीय टपाल विभागाचे 'वन स्टॉप राखी सोल्युशन'; बुलढाणा विभागातील सर्व टपाल कार्यालयांत विशेष राखी लिफाफे उपलब्ध

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा । प्रतिनिधी :** रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर भाऊ-बहिणीच्या प्रेमाच्या पवित्र नात्याला अधिक सुरक्षित आणि वेळेत जपण्यासाठी भारतीय टपाल विभागाने 'वन स्टॉप राखी सोल्युशन' ही विशेष सुविधा सुरू केली आहे. या अंतर्गत बुलढाणा विभागातील सर्व टपाल कार्यालयांमध्ये विशेष जलरोधक (वॉटरप्रूफ) राखी लिफाफे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

हे विशेष राखी लिफाफे केवळ १२ रुपये प्रति लिफाफा या माफक दरात उपलब्ध असून, ते तीन आकर्षक डिझाईन्समध्ये विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत. पावसाळ्याचा विचार करून या लिफाफ्यांची जलरोधक रचना करण्यात आली असून, त्यामुळे राखी सुरक्षितपणे गंतव्यस्थानी पोहोचण्यास मदत होणार आहे. ग्रामीण भागातील टपाल कार्यालयांमध्येही हे लिफाफे उपलब्ध असून, त्यासोबत स्पीड पोस्ट सुविधेचाही लाभ नागरिकांना घेता येणार आहे.

याशिवाय, सुरक्षित पॅकिंग, स्पीड पोस्ट, नोंदणीकृत टपाल, पार्सल बुकिंग तसेच देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पार्सल सेवा अशा सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे देशात किंवा परदेशात राहणाऱ्या भावंडांना राखी, भेटवस्तू, मिठाई आणि इतर वस्तू सुरक्षित व वेळेत पाठविणे अधिक सुलभ झाले आहे. रक्षाबंधनाच्या काळात मोठ्या प्रमाणावर राख्या पाठविल्या जात असल्याने शेवटच्या क्षणी होणारी गर्दी टाळण्यासाठी नागरिकांनी राखी शक्य तितक्या लवकर पोस्ट करावी, असे आवाहन टपाल विभागाने केले आहे.

बुलढाणा विभाग अधीक्षक डाकघर गजेंद्र एन. जाधव यांनी नागरिकांना भारतीय टपाल विभागाच्या विश्वासार्ह, सुरक्षित आणि किफायतशीर सेवांचा लाभ घेण्याचे आवाहन केले असून, विशेष राखी लिफाफे, स्पीड पोस्ट व पार्सल सेवेमुळे देश-विदेशातील प्रियजनांपर्यंत प्रेमाचे बंध सुरक्षितपणे आणि वेळेत पोहोचविणे अधिक सोपे झाल्याचे त्यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांच्या पांदण रस्त्यांसाठी आमदार सिद्धार्थ खरात ॲक्शन मोडमध्ये

## अधिकाऱ्यांना स्पष्ट आदेश–कामांतील दिरंगाई खपवून घेणार नाही!

**दैनिक आपला विदर्भ**





मेहकर : शेतकऱ्यांच्या शेतीपर्यंत पोहोचण्याचा मार्ग सुकर व्हावा आणि मातोश्री पांदण रस्ते तसेच बळीराजा पांदण रस्ते योजनेंतर्गत सुरू असलेल्या कामांना गती मिळावी, यासाठी आमदार सिद्धार्थ खरात यांनी प्रशासनाची महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेऊन अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत धारेवर धरले. शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या या बैठकीत प्रलंबित कामांचा सखोल आढावा घेत संबंधित विभागांना तातडीने कामे पूर्ण करण्याचे कठोर निर्देश देण्यात आले.

या बैठकीस तहसीलदार निलेश मडके, पंचायत समितीचे अधिकारी, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, शिवसेना उ.बा.ठा तालुकाप्रमुख निंबाजी पांडव, युवासेना तालुकाप्रमुख ॲड. आकाश घोडे, डॉ. नंदकिशोर देशमुख, दत्ता घनवट यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत प्रत्येक पांदण रस्त्याचा स्वतंत्र आढावा घेण्यात आला. कामांमध्ये येणाऱ्या अडचणी, निधीची उपलब्धता, तांत्रिक बाबी तसेच अंमलबजावणीतील विलंब यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. ज्या ठिकाणी कामे रखडली आहेत, ती तात्काळ मार्गी लावण्याच्या सूचना आमदार खरात यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले, शेतकऱ्यांच्या हिताशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. पांदण रस्ते हे केवळ रस्ते नसून शेतकऱ्यांच्या शेतीचा श्वास आहेत. कोणत्याही अधिकाऱ्याने निष्काळजीपणा करू नये. सर्व कामे गुणवत्तापूर्ण आणि निश्चित वेळेत पूर्ण झाली पाहिजेत. कामात दिरंगाई करणाऱ्यांची गय केली जाणार नाही.बैठकीत शेतकऱ्यांच्या अडचणींना सर्वोच्च प्राधान्य देत पांदण रस्त्यांची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

या निर्णयामुळे मेहकर मतदारसंघातील अनेक गावांतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून शेतीमालाची वाहतूक, शेतीची मशागत आणि दैनंदिन शेतीकामे अधिक सुलभ होणार आहेत. शेतकऱ्यांच्या विकासासाठी प्रशासनाला गती, कामात गुणवत्ता आणि निर्णयात तत्परता हा स्पष्ट संदेश या बैठकीतून आमदार सिद्धार्थ खरात यांनी प्रशासनाला दिला.